# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

( एकमेव मान्यताप्राप्त युनियन )

**मुंबई, 13 जाने. 2017**

मित्रहो,

ऑफशोअरमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नॅशनल हॉलिडे तसेच 14 दिवसांच्या नॉर्मल ड्युटीनंतर सलग अधिक दिवस ड्युटी करावी लागल्यास किंवा आपल्या नॉर्मल 12 तासांच्या ड्युटीनंतर सलग 12 तासापर्यंत ड्युटी केल्यास OT अधिक C/off चा फायदा पूर्वी कामगारांस मिळत असे. परंतू काही महिन्यांपासून म्हणजे ज्यावेळेपासून OT वेबआइसमधून क्लेम करण्यास सुरुवात झाली त्यावेळी असे निदर्शनास आले कि एखाद्या अधिकाऱ्याने कामगाराच्या वेबआइसमध्ये OT क्लेम केला कि तेथे OT किंवा C-off यापैकी एकच क्लेम मिळेल अशा आशयाचा सिस्टीममध्ये मेसेज येवू लागला. याचे कारण OT फॉर्ममध्ये तशा आशयाची अट टाकण्यात आली होती. फॉर्ममधील या अटीमुळे ऑफशोअरमधील अधिकारी OT व C/off या दोन्ही फायद्यांपैकी एकच फायदा कामगारांना देवू शकत होते. वेबआइस सिस्टिम मधील ओव्हर टाईम फॉर्ममध्ये असलेल्या अटीमुळे OT व C/off असे दोन्ही क्लेम एकाच वेळी सिस्टीम देखील Accept करीत नव्हती.

सदर समस्या कर्मचारी संघटनेने आपल्या पत्र क्र. 167 द्वारे दि. 17/11/2016 रोजी लिहून व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून दिली. माईन्स ॲक्ट मध्ये ओव्हरटाईम संदर्भात असलेल्या कायदेशीर तरतुदीनुसार कामगारांना ऑफशोअरमध्ये हे दोन्ही फायदे मिळणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे या मागणीस पूष्टी देणारी आवश्यक कागदपत्रेही जोडली व व्यवस्थापनाच्या विविध पातळयांवर हा मुद्दा चर्चेस आणून त्याचा सतत पाठपुरावा केला.

कर्मचारी संघटनेच्या सततच्या प्रयत्नांना यश प्राप्त होवून व्यवस्थापनाने कर्मचारी संघटनेची माईन्स ॲक्ट कायद्यानुसार असलेली मागणी मान्य करुन आईस टीमला OT फॉर्ममध्ये आवश्यक बदल करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे यापुढे याबाबतीती संदिग्धता दूर होवून कामगारांना OT तसेच C/off असे दोन्ही फायदे मिळतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी. यासाठी मुंबई व्यवस्थापनातील ED-HRO मा. श्री. गोपीनाथ साहेब व GM, I/c HR-ER, RO मा. श्री. दुबे साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

धन्यवाद !

**कामगार एकता झिंदाबाद !**

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

**( प्रकाश दळवी )**
**अध्यक्ष**

**( प्रदीप मयेकर )**
**सरचिटणीस**